

**लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी रजिस्टर्ड संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झालेले मनोज पार्सेकर यांचे अभिनंदन करताना संस्था कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये. सोबत प्राचार्य देशमुख, माजी विद्यार्थी संघटनेचे सल्लागार सदस्य संदीप देसाई, उपाध्यक्ष ॲड. मनोज सावंत, सुहास परब, लखु खरवत, भूषण सावंत, प्रा. ढेपे सर.**

# दोडामार्ग महाविद्यालयात माजी विद्यार्थी रजिस्टर्ड संघटनेची स्थापना

**■ अध्यक्षपदी मनोज पार्सेकर, सल्लागारपदी संदीप देसाई तर उपाध्यक्षपदी सुहास परब-मनोज सावंत यांची निवड**

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग :** दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी रजिस्टर्ड संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून गोवा येथील सीआयडी विभागात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी मनोज पार्सेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी 'कोकणसाद लाईव्ह' व 'कोकणसाद'चे ब्युरो चीफ संदीप देसाई यांची संघटनेच्या सल्लागार सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठ नॅकच्या संलग्नित दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी माजी विद्यार्थ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला माजी विद्यार्थी संदीप देसाई, मनोज पार्सेकर, सुहास परब, ॲड. मनोज सावंत, लखु खरवत, भूषण सावंत, नाईक, सौ. नाईक, प्रा. ढेपे, प्रा. खडपकर उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थी संघटना स्थापनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

संघटनेचे कार्य, जबाबदारी, उद्दिष्ट याबाबत चर्चा करून संघटना पदाधिकारी निवड करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून मनोज पार्सेकर, सल्लागार सदस्य म्हणून संदीप देसाई, उपाध्यक्ष म्हणून सुहास परब, मनोज सावंत, खजिनदार राजेश नाईक, सदस्य लखु खरवत, तेजस देसाई, महेश गावडे, रजत राणे आदींची निवड करण्यात आली. या निवडीनंतर संस्था कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये, प्राचार्य देशमुख यांनी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे अभिनंदन केले.